# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील २१ वा रविवार – २५ ऑगस्ट २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना सार्वकालिक जीवन ख्रिस्तामध्येच आहे ही शिकवण भाविकांच्या मनावर ठसविण्यासाठी पवित्र आत्म्याची विशेष कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी देशाचा कारभार पाहताना सामान्य लोकांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देऊन त्यावर उपाययोजना करण्याचे प्रयत्न करावेत, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. आजच्या शुभवर्तमानात पेत्र प्रभूला उत्तर देतात, 'प्रभो सार्वकालिक जीवनाची वचने आपणाजवळ आहेत'. हेच शब्द प्रत्येक ख्रिस्ती भाविकाचे बनावेत व ख्रिस्त आपला तारणारा आहे ही श्रद्धा प्रकट करण्यासाठी आपल्याला शक्ती मिळावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

४. ख्रिस्ती श्रद्धेमुळे आज जगात ज्या लोकांवर अन्याय होत आहेत अशा लोकांना ख्रिस्ती श्रद्धेत एकनिष्ठ राहण्यासाठी पवित्र आत्म्याची कृपा व सामर्थ्य लाभावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी व निराधार लोकांना व्हावा, परगावात, परदेशात व प्रवासात असणा-यांवर प्रभूचा आशीर्वाद असावा, आपल्याला चांगले हवामान व पुरेशा पाऊसाची देणगी मिळावी, जगात सर्वत्र शांती असावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.